आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

६ डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उदघाटन होणार

- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन

- रेपो दर साडे सहा टक्क्यावर कायम ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय

- अदानी लाचखोरी प्रकरणी लोकसभेत विरोधकांचा गदारोळ कायम राहिल्यानं आजही कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारताची फलंदाजी गडगडली

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी नवी दिल्ली इथं अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उदघाटन करणार आहेत. भारत मंडपम इथं तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा या आठ राज्यांमधले अडीचशे कारागीर सहभागी होणार आहेत. यात ग्रामीण हाट बाजाराचं आयोजन होणार असून त्यात कारागीर, उद्योजक आणि शेतकरी आपल्या हस्तकला, हातमाग वस्त्रे, पर्यटन स्थळे तसेच विशेष कृषी

उत्पादनांचं प्रदर्शन आणि विक्री करणार आहेत. यात जी आय टॅग मिळालेल्या ३४ उत्पादनांचा समावेश आहे. यादरम्यान फॅशन शो आणि डिझाईन कॉन्क्लेव्ह च्या द्वारे व्यापाराच्या संधी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

<><><><>

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूवनेश्वर इथं आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात देखील डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केलं आहे. समता आणि माणसांच्या सन्मानासाठी आंबेडकरांनी दिलेला अथक लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, त्यांचं स्वप्न पूर्ण करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत आहोत, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं.

<><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पत धोरण समितीनं रेपो दरात काहीही बदल न करता तो साडे सहा टक्के कायम राखण्याचा निर्णय घेतला आहे. समितीनं हा दर कायम राखण्याची ही ११वी वेळ आहे. यामुळे स्थायी ठेव सुविधा दर सव्वा सहा टक्के तर सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर पावणे सात टक्के कायम राहणार आहे. रिजर्व्ह बँकेनं फेब्रुवारी 2023 पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही.

**<><><>**

न्यायव्यवस्थेनं शिक्षेपेक्षा न्याय देण्यावर भर द्यावा, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. भुवनेश्वर इथं नवीन न्यायालय संकुलाचं उद्घाटन काल राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. गरिबांना अनावश्यक त्रासदायक ठरणारी, न्यायापासून वंचित ठेवणारी आणि खटले सातत्यानं पुढे ढकलण्याची ही व्यवस्था आता बदलायला हवी, असं आवाहन त्यांनी कायदेतज्ज्ञांना केलं. भारतीय न्याय संहितेनं देशातील वसाहतवादी न्यायव्यवस्था संपुष्टात आणली असून त्यामुळे भारतीय दंड संहितेचा अंत झाला आहे. जनतेला पोलीस आणि न्यायालयांविषयी निर्भय बनवणं हा यामागचा मुख्य उद्देश आहे, असं त्या म्हणाल्या. सर्वसामान्यांच्या हितासाठी न्यायालयीन आदेश स्थानिक भाषांमध्ये देण्याचे आणि प्रसिद्ध करण्याचं आवाहनही राष्ट्रपतींनी केलं.

**<><><>**

केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सार्वजनिक वितरण प्रणाली अर्थात पीडीएस मधील पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढविण्याचं प्रमुख साधन म्हणून उपयुक्त ठरणारा अन्नचक्र हा

उपक्रम काल नवी दिल्ली इथं सुरू केला. याशिवाय राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यासाठी (स्कॅन) अर्थात सबसिडी क्लेम अ्प्लिकेशन नावाचं पोर्टलही काल सुरू करण्यात आलं. या अभिनव उपक्रमामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व वाढेल, असं जोशी म्हणाले. सार्वजनिक वितरण प्रणालीचं पूर्णपणे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने ही पावलं उचलण्यात आली आहेत.

<><><>

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा  उद्या हरयाणातील पंचकुला इथं देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेची सुरुवात करतील. देशातल्या ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ३४७ जिल्ह्यांमधून राबवली जाणारी ही मोहीम १०० दिवस चालणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी २०१८ मध्ये क्षयरोग निर्मूलन परिषदेत या उपक्रमाची प्रथम घोषणा केली होती. या १०० दिवसांच्या मोहिमेत अधिक प्रमाणात क्षयरोगी असलेल्या वस्तींशी संपर्क वाढवून नवीन रुग्ण शोधणे, गंभीर आजारी क्षयरोग्यांसाठी आधुनिक उपचार, तसंच पोषक  आहाराच्या पुरवठ्यावर भर दिला जाईल.

<><><>

अदानी लाचखोरी प्रकरण आणि अन्य मुद्द्यांवरून विरोधकांनी लोकसभेत आज गदारोळ केल्यानं सभागृहाचं कामकाज प्रारंभी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब केलं. सभागृहाचं कामकाज आता सोमवारी ९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुरू होईल.

आज सकाळी लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा काँग्रेससह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात गदारोळ करायला सुरुवात केली. त्यावेळी सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू करायला सांगितलं. परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ सुरूच ठेवल्यानं सभापतींनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केलं.

दरम्यान, अदानी उद्योग समूहावरील कथित लाचखोरी आरोपांविरोधात इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या परिसरात आज सकाळी निदर्शनं केली. या निदर्शनात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा आणि डावे पक्ष सहभागी झाले होते. संसदेच्या संयुक्त समितीनं या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी केली.

**<><><><>**

राज्यसभेचं कालचं कामकाज तहकूब झाल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी करताना एका आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आली. आज सकाळी राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यानंतर सभापती जगदीप धनखड यांनी सभागृहातील २२२ क्रमांकाच्या आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आल्याची माहिती सदस्यांना दिली. हे आसन काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांचं असून याप्रकरणी तपास सुरू असल्याचंही धनखड यांनी सांगितलं.

संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी सभापतींशी सहमती दर्शवत याप्रकरणाची गंभीरपणे चौकशी केली जावी असं सांगितलं. अशा घटनांमुळे सभागृहाची प्रतिष्ठा कमी होत असल्याबद्दल सभागृहाचे नेते जगत

प्रकाश नड्डा यांनी चिंता व्यक्त केली. या घटनेच्या चौकशीबद्दल कोणताही आक्षेप नसल्याचं विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.

दरम्यान, या घटनेप्रकरणी खासदार अभिषेक सिंघवी यांनी खुलासा केला आहे. सभागृहात जेव्हा जातो तेव्हा पाचशे रुपयाची एकच नोट जवळ बाळगतो, असं सिंघवी यांनी सांगितलं. काल दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी सभागृहात गेलो आणि एक वाजता बाहेर पडल्याचं त्यांनी सांगितलं. खासदार अयोध्या रामी रेड्डी यांच्याबरोबर दीड वाजेपर्यंत कँटिनमध्ये होतो आणि त्यानंतर बाहेर पडल्याचं सिंघवी यांनी सांगितलं.

**<><><><>**

फ्रान्सच्या नव्या प्रधानमंत्र्यांच्या नावाची घोषणा लवकरच केली जाईल, असं फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रोन यांनी जाहीर केलं आहे. मॅक्रोन यांनी काल संसदेला संबोधित करताना ही माहिती दिली. फ्रान्सचे प्रधानमंत्री मिशेल बार्नियर यांनी संसदेत त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्यानं राजीनामा दिला आहे. विरोधी पक्षाच्या दबावाला न  जुमानता २०२७ मध्ये आपला कार्यकाळ संपेपर्यंत आपण पदावर कायम राहणार असल्याचं मॅक्रोन यांनी यावेळी सांगितलं. हे सरकार पाडण्यासाठी कडव्या उजव्या आणि डाव्या विचारसरणीच्या नेत्यांनी लोकशाही विरोधी मोर्चा उघडला असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेलता दुसरा सामना आज सुरू झाला. ॲडलेड इथल्या ओव्हल मैदानावर सकाळी साडे नऊ वाजता सुरू झालेला हा सामना गुलाबी

चेंडूच्या वापरासह दिवस-रात्र खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ऑस्ट्रेलियन गोलंदाजी पुढे भारतीय फलंदाज ढेपाळले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ८ बाद १४१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><>//**